# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि. २० नोव्हेंबर, २०२०

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

जळगाव दि.२० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतिम वर्ष/ अंतिम सत्राच्या बॅकलॉगसह नुकत्याच घेण्यात आलेल्या परीक्षेत जे विद्यार्थी काही कारणामुळे परीक्षा देऊ शकले नव्हते अशा वंचित विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत आज तिसऱ्या दिवशी दुपारपर्यंत ५९५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.

दरम्यान शुक्रवारी बीए/एमसीजे, बीपीई, एमएड, एमपीएड आणि एमसीए इंटिग्रेटेड या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.१२ ऑक्टोबर पासून अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात आल्या. जे विद्यार्थी परीक्षा अर्ज सादर करूनही परीक्षा देऊ शकले नाहीत त्यांच्यासाठी ऑनलाईन पध्दतीने सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत या परीक्षा घेण्यात येत आहेत. दि.२४ ऑक्टोंबर ते १२ नोव्हेंबर या कालावधीतील वेळापत्रकातील सर्व विषयांसाठी परीक्षा दि.२१ ते २३ नोव्हेंबर या कालावधीत परीक्षा घेतल्या जात आहेत. शुक्रवारी ५९५ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी